# 'द न्यूज बिज टाईम्स'

thenewzbiz@com ७/०८/२०२५, पिंपरी, महाराष्ट्र, संपर्क : ९७६६९५२११४ thenewzbiz@gmail.com वर्ष – दुसरे डिजीटल आवृती


# अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या Cyber Warriors टीमकडून सायबर सुरक्षा जनजागृती



**पुणे, प्रतिनिधी** : Quick Heal Foundation अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या डूलशी झक्ळझीहर पी डूलशी डीरझीहर या उपक्रमाच्या माध्यमातून अण्णासाहेब मगर महाविद्यालयाच्या डूलशी थरींळी टीमने चंद्रभागा बाबुराव तुपे साधना विद्यालय, हडपसर येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवणे, सुरक्षित इंटरनेट वापराचे महत्त्व पटवून देणे आणि सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सजगता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स शाखेचे विद्यार्थी Cyber Warriors म्हणून सहभागी झाले होते. तेजस दळवी, मृणाल दाणेज, आश्लेषा दामगुडे, प्रणाली शिंदे, समीक्षा गायकवाड, अंकिता हरपळे, अवधूत मोरे, वेदिका अकोटकर, अक्षय ढेरे, यशराज काकेकर, अक्षय चोपडे, तसेच नव्याने सहभागी झालेले यश भराटे, आदित्य बेल्हेकर, अहन दगडे, पायल पठारे, अंकिता माने, अस्मिता काळे, नेहा विश्वासे, अपूर्वा वाळ्के या स्वयंसेवकांनी Quick Heal Foundation अँपच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षित होऊन विद्यार्थिनींना सायबर सुरक्षेचे विविध पैलू अत्यंत प्रभावी पद्धतीने समजावून सांगितले.

पाचवी ते दहावी पर्यंतच्या २४०० हून अधिक विद्यार्थिनींना सोशल मिडिया वापरातील धोके, गोपनीयता राखण्याचे उपाय, फिशिंग, OTP फसवणूक, बनावट लिंक, पासवर्ड सुरक्षेचे महत्त्व इत्यादी बाबी संवादात्मक सत्राद्वारे शिकवण्यात आल्या. विद्यार्थिनींनी कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला, सायबर सुरक्षेवर प्रश्न विचारले, अनुभव शेअर केले आणि सायबर सुरक्षेची शपथ घेतली.

मुलींमध्ये डिजिटल सुरक्षा आणि आत्मरक्षणाची जाणिव निर्माण होणे अत्यंत महत्त्वाचे असून, हा उपक्रम त्या दिशेने सकारात्मक पाऊल ठरला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, उपप्राचार्य डॉ. प्रशांत मुळे, डॉ. शुभांगी औटी, डॉ. विलास वाणी, प्रा. अनिल जगताप व प्रा. मनिषा गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये सायबर जागरूकता वाढत असून, ते आता अधिक सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल नागरिक बनत आहेत.

शाळेच्या मुख्याध्यापिका उर्मिला पाटील व पर्यवेक्षक सावंत यांनी उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते, त्यांची सजगता वाढते आणि आत्मविश्वास निर्माण होतो.

Quick Heal Foundationच्या CSR उपक्रमांतर्गत अशा कार्यक्रमांचे आयोजन महाराष्ट्रातील विविध शाळांमध्ये करण्यात येत असून, यामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल जबाबदारीची भावना निर्माण होत आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना डिजिटल युगात सुरक्षिततेचे भान देणारा ठरतोय आणि शालेय पातळीवर सायबर शिक्षणाची भक्कम पायाभरणी करतो आहे.